दिव्य मराठी धाराशिव जिल्हा 16-09-2024

गिरीश भगत, लोहारा

# सायबर फसवणूक टाळण्यासाठी डिजिटल साक्षरता महत्वाची

प्रतिनिधी | लोहारा

तालुक्यातील हिप्परगा (रवा) येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यालयात शनिवारी (दि.१४) 'सायबर गुन्हे साक्षरता कार्यशाळा' घेण्यात आली.

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील हिप्परगा (रवा) येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यालयात सायबर गुन्हे साक्षरता कार्यशाळा घेण्यात आली. यात क्रांती वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून वाचण्यासाठी काय करावे, याबाबत मार्गदर्शन केले. वाढत्या आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यांचे स्वरूप, महिला व मुलींना फोटो मार्फ करून घडणारे ब्लॅकमेकिंगचे प्रकार, फोन व जीमेल हॅकिंग, इतर समाजमाध्यमावरील अकाउंट हॅक करून आर्थिक, शारीरिक व मानसिक फसवणूक कशी केली जाते, हे सांगितले. अशा गुन्ह्यातून बाहेर पडण्याचे मार्ग न सुचल्याने मोठी हानी होते. यातून वाचण्यासाठी आपला मोबाइल, संगणक, लॅपटॉप, इंटरनेटचा काळजीपूर्वक वापर केला पाहिजे, असे मार्गदर्शन क्रांती वाघमारे यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांच्यातील सायबर आणि इतर ऑनलाइन फसवणुकीसंदर्भात जागरुकता निर्माण केली. यावेळी मुख्याध्यापक एस. बी. भोईटे, बी. एस. स्वामी, जी. डी. मैंदाड, ए. व्ही. जाधव, एस. के. जाधव यांच्यासह कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. जे. मनोहर यांनी केले.



विद्यार्थ्यांना क्रांती वाघमारे यांनी रामानंद तीर्थ विद्यालयात मार्गदर्शन केले.

## ओटीपी देऊ नका, अनोळखी लिंक्स, वेबसाइट उघडू नका

तसेच कोणालाही आपली व्यक्तिगत माहिती व ओटीपी देऊ नये, अनोळखी लिंक्स, वेबसाइट व अनोळखी व्यक्तींपासून सावध राहण्याचे कौशल्य आपण आत्मसात केले पाहिजे. तेव्हा आपली फसवणूक होणार नाही. डिजिटल साक्षरतेतून समाजातील सायबर गुन्ह्यांना आळा बसण्यास मदत होईल, असे क्रांती वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.